महाराष्ट्र शासन
वन विभाग
प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय.
O/o Principal Chief Conservator of Forests (HoFF), Maharashtra State
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य
Principal Chief Conservator of Forests (Wildlife), Maharashtra State
"Van Bhavan"3rd Floor, Ramgiri Road, Civil Lines, Nagpur 440 001

Phone - 0712-2549563
E-mail - pccfwlngp@mahaforest.gov.in
Website - www.mahaforest.gov.in

क्रमांक :-कक्ष-२३(४)/प्रक्र.८२(२०१२-१३)२०२२-२३/ २३४ दिनांक :- २८/०४/२०२२

प्रती,

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पूर्व नागपूर/पश्चिम मुंबई.
मुख्य वनसंरक्षक, तथा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती.
वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर/
सहयाद्री व्याघ्र प्रकल्प, कोल्हापूर/ पेंच व्याघ्र प्रकल्प,नागपूर
उपवनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक नवेगांव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प, गोंदिया.

विषय :- वन्यजीव संरक्षित क्षेत्रात प्रवेशाकरीता वन कर्मचा-यांना प्रवेश शुल्क भरण्यापासून सूट देणेबाबत.

संदर्भ:- १) या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष -२३(४)/प्रक्र.८२(१२-१३)/१३०८, दिनांक ११/०७/२०१४.
२) या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष -२३(४)/प्रक्र.८२(१२-१३)/४३७७, दिनांक १३/०३/२०१९.
३) या कार्यालयाचे आदेश क्र.कक्ष-२३(४)/प्रक्र.८२(१२-१३)/२७३६, दिनांक ०८/०२/२०२१.

उपरोक्त संदर्भ क्र. ३ चे पत्रान्वये विषयांकित प्रकरणी खालील प्रमाणे सविस्तर सुचना देण्यात आल्या होत्या. महाराष्ट्र वन विभागात नियमितरित्या नियुक्त व कार्यरत तसेच सेवानिवृत्त प्रत्येक व्यक्ती ( अधिकारी किंवा कर्मचारी ) व त्यांचे कुटुंबीय यांना पुढील आदेशापावेतो राज्यातील अभयारण्य किंवा राष्ट्रीय उद्यानात पर्यटनाकरीता प्रवेशाकरीता व त्यांचे वाहनाने प्रवेशाकरिता परवान्याचे शुल्क भरण्यापासून सुट राहील असे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. संदर्भ क्र. ०२ अन्वये ही सुट महाराष्ट्र वन विकास महामंडळाच्या अधिकारी/कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांनाही उपलब्ध करण्यात आली आहे. मात्र सदर आदेशाची योग्य अंमलबजावणी होत नसल्याचे दिसून येते. याकरिता आपले अधिनस्त सर्व अधिकारी व कर्मचारी (क्षेत्रीय व कार्यालयीन) यांना सदर आदेशाची प्रत उपलब्ध करुन द्यावी व आरक्षणाशी/प्रवेश देण्याशी संबंधीत अधिकारी व कर्मचारी यांना या आदेशाची योग्य प्रकारे अंमलबजावणी करण्याचे निर्देश द्यावे.

२) बहुतांश संरक्षित क्षेत्राचे आरक्षण ऑन लाईन पध्दतीने होत आहे. अशा ठिकाणी महाराष्ट्र वनविभागातील कार्यरत व सेवानिवृत्त कर्मचारी व त्यांचे कुटुंबीयांकरिता आरक्षणाची सुविधा उपलब्ध व्हावी याकरीता महा IT शी त्वरीत संपर्क साधण्यात यावा व आरक्षणाच्या सॉप्टवेअर मध्ये १ महिन्याचे आत योग्य तो बदल करावा व तसे या कार्यालयास अवगत करावे. ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील आरक्षण प्रणाली

वेगळयाने कार्यान्वीत करण्यात येत असल्याने त्यांनीही त्यांच्या आरक्षणाच्या प्रणालीत सॉफ्टवेअर मध्ये योग्य तो बदल करावा व राज्यातील वनविभागातील तसेच वनविकास महामंडळातील कार्यरत व सेवानिवृत्त अधिकारी /कर्मचारी व त्यांचे कुटुंबिय यांना सदर आरक्षण प्रणालीमध्ये आरक्षणाचा पर्याय उपलब्ध होईल हे सुनिश्चित करावे.

३) जेष्ठ सेवानिवृत्त अधिकारी /कर्मचारी हे ऑन लाईन आरक्षण प्रणालीशी परिचित असतीलच असे नाही. तसेच आरक्षणाकरिता संगणक हाताळणे त्यांना शक्य होईल असेही नाही. त्यामुळे जेष्ठ नागरीक स्नेही ऑफ लाईन आरक्षण करण्याचा पर्याय जेष्ठ कर्मचारी/अधिकारी यांच्यासाठी प्राधान्याने उपलब्ध करुन द्यावा.

४) उपरोक्त संदर्भिय आदेशातील इतर अटी व ~~शर्ती~~ शर्ती नमुद केल्यानुसार लागु राहतील.

५) वनविभागातील अधिकारी /कर्मचारी यांचे करिता त्यांचे अधिनस्त संरक्षित क्षेत्रात किती टक्के आरक्षण राखीव ठेवावे (Quota) याबाबत आपले अभिप्राय ७ दिवसाचे आंत सादर करण्याबाबत संदर्भिय पत्र क्र. ३ अन्वये कळविण्यात आले होते.

परंतु या सुचनाची अंमलबजावणी झाल्याचे होत असल्याचे दिसून येत नाही.

वन विभागात नियमितरित्या नियुक्त व कार्यरत तसेच सेवानिवृत्त प्रत्येक व्यक्ती ( अधिकारी किंवा कर्मचारी ) व त्यांचे कुटुंबीयांना राज्यातील अभयारण्य किंवा राष्ट्रीय उद्यानात पर्यटनाकरीता प्रवेशाकरीता व त्यांचे वाहनाने प्रवेशाकरिता परवान्याचे शुल्क भरण्यापासून सुट देण्याचे आदेश निर्गमित होवून सुध्दा अद्यापि आपले कार्यालयाकडून आरक्षणाच्या प्रणालीतील सॉफ्टवेअर मध्ये योग्य तो बदल करण्यात आलेला नाही. तरी आरक्षणाच्या प्रणालीतील सॉफ्टवेअर मध्ये योग्य तो बदल करण्यात यावा, जेणेकरुन आरक्षण प्रणालीमध्ये वनविभागात नियमितरित्या नियुक्त तसेच सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी यांचे करिता व त्यांचे कुटुंबियांकरिता आरक्षणाचा पर्याय उपलब्ध होईल. हा बदल तातडीने करुन या कार्यालयास दिनांक ३०/०४/२०२२ पर्यंत कळवावे.

संदर्भिय पत्र क्र. ३ अन्वये कळविल्यानुसार वन विभागातील अधिकारी / कर्मचारी यांचे करिता किती टक्के आरक्षण राखीव ठेवावे याबाबत आपले अभिप्राय दिनांक ३०/०४/२०२२ पर्यंत सादर करावे.

25/4/22

(सुनील लिमये)
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव),
महाराष्ट्र राज्य

प्रतिलिपी:-

१) महाराष्ट्र वनसेवानिवृत्त (पेन्शनर्स) असोसिएशन नागपूर यांना त्यांचे पत्र दिनांक २१/१२/२०२० चे अनुषंगाने माहितीस सस्नेह रवाना.
२) महा IT यांना संबंधित मुख्य वनसंरक्षक /वनसंरक्षक /क्षेत्र संचालक व्याघ्र प्रकल्प यांचे मार्फत आवश्यक कार्यवाहीस रवाना.
3) **व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वनविकास महामंडळ मर्यादित यांना माहितीस तसेच अशीच सुट बाळासाहेब ठाकरे आंतरराष्ट्रीय सफारी गोरेवाडा येथेही वनविकास महामंडळ मर्यादित यांचे व वनविभागाचे कार्यरत व सेवानिवृत्त अधिकारी /कर्मचारी व त्यांच्या कुटुंबीयांना याच प्रकारची सुट देण्याबाबत विचार व्हावा ही विनंती.**